MPSCKEEDA

UPSC, MPSC, COMBINE गट ब गट क, तलाठी, पोलीस भरती

एकच ॲप – अनलिमिटेड अभ्यासक्रम, अनलिमिटेड सराव!

संपूर्ण नोट्स +
अनलिमिटेड TEST सिरीज

टॉपिकनुसार नोट्स + PYQ
प्रत्येक विषयाच्या टॉपिकनुसार नोट्स + टॉपिकचे

100 TEST प्रत्येक विषय

LIVE + कोणत्याही वेळेत टेस्ट सिरीज
टॉपिकनुसार, प्रत्येक टॉपिकचे 25 प्रश्नांचे

500 TEST ऑल महाराष्ट्र रँकिंग

मिनी मॉक टेस्ट
संपूर्ण विषय किंवा कोणतेही दोन विषय • 25 प्रश्न

200 TEST विश्लेषणासहित

फुल मॉक टेस्ट
संपूर्ण पेपर स्वरूपात • दिवसाला एक टेस्ट

365 TEST विश्लेषणासहित

दिवाळी ऑफर

₹499 / एक वर्ष

किंवा

₹99 प्रति महिना

आत्ताच डाउनलोड करा

JOIN NOW • MPSCKEEDA APP

मोफत सराव, मोफत PDF, मोफत चालू घडामोडी नोट्स साठी

test.mpsckeeda.com ही वेबसाईट सुरू करा

Google Play Store वर उपलब्ध • या पानावर कुठेही टॅप करा

Maharashtra Public Service Commission Assessment

Question Paper Name :	Assistant Director Cultural Affairs 14th August 2025 Shift 1
Subject Name :	Assistant Director Cultural Affairs
Creation Date :	2025-08-14 11:54:44
Duration :	60
Total Marks :	200
Display Marks:	Yes
Share Answer Key With Delivery Engine :	No
Actual Answer Key :	Yes

Assistant Director Cultural Affairs

Group Number :	1
Group Id :	56230330
Group Maximum Duration :	0
Group Minimum Duration :	60
Show Attended Group? :	No
Edit Attended Group? :	No
Break time :	0
Group Marks :	200

Assistant Director Cultural Affairs

Section Id :	56230330
Section Number :	1
Section type :	Online
Mandatory or Optional :	Mandatory
Number of Questions :	100

Number of Questions to be attempted :	100
Section Marks :	200
Maximum Instruction Time :	0
Sub-Section Number :	1
Sub-Section Id :	56230342
Question Shuffling Allowed :	Yes

Question Number : 1 Question Id : 5623032861 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील घटनांचा योग्य कालानुक्रमे क्रम लावा.

a. वि. दा. सावरकरांनी मर्सेलिस बंदरातून समुद्रात उडी मारली.

b. पुण्यात इंग्रज अधिकारी रॅड व आयर्स्ट यांचा खून.

c. नाशिकचे कलेक्टर जॅक्सन याचा वध.

d. 'अभिनव भारत' संस्थेची स्थापना.

Options :

1. c, a, b, d

2. b, d, c, a

3. b, d, a, c

4. a, c, d, b

Question Number : 2 Question Id : 5623032862 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सर्वात प्रथम इ.स. 1905 साली गोपाळ कृष्ण गोखले यांनी राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने भारताचे कोणते ध्येय घोषित केले ?

अ. लोकशाही राज्य

ब. समाजवादी राज्य

क. स्वतंत्र भारत

ड. ब्रिटीश साम्राज्यांतर्गत स्व-शासन

Options :

1. फक्त ड

2. फक्त अ

3. फक्त ब

4. फक्त क

Question Number : 3 Question Id : 5623032863 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

इ. स. 1942 च्या क्रांतीची प्रेरणा व संदेश भारतभर प्रसारित करण्यासाठी मुंबई येथे 'सिक्रेट रेडिओ स्टेशन' सुरू करण्याचे कार्य खालीलपैकी कोणी केले होते ?

अ. अवंतिकाबाई भोसले

ब. उषा मेहता

क. विठ्ठलदास जव्हेरी

ड. चंद्रकान्त बाबू जव्हेरी

Options :

1. फक्त अ, ब आणि क

2. फक्त ब, क आणि ड

3. फक्त अ, क आणि ड

4. फक्त क आणि ड

Question Number : 4 Question Id : 5623032864 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

कोणत्या समाजसुधारकास पुणे येथील शिवछत्रपतींच्या स्मारकाची कोनशिला ब्रिटीश युवराजाच्या हस्ते बसवणे पसंद पडले नव्हते ?

Options :

1. गोपाळ हरी देशमुख

2. महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

3. महर्षी धोंडो केशव कर्वे

4. कर्मवीर भाऊराव पाटील

Question Number : 5 Question Id : 5623032865 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्रातील जलसिंचन प्रकल्प व जलाशयांचे नाव यांच्या योग्य जोड्या लावा :

प्रकल्प	**जलाशयांचे नाव**
अ. कोयना	I. नाथसागर
ब. भंडारदरा	II. नलदमयंतीसागर
क. अप्पर वर्धा	III. आर्थर सरोवर
ड. जायकवाडी	IV. शिवसागर

Options :

1. अ – I ब – II क – III ड – IV

2. अ – IV ब – II क – III ड – I

3. अ – IV ब – III क – II ड – I

4. अ – III ब – I क – IV ड – II

Question Number : 6 Question Id : 5623032866 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्राच्या पूर्वेस 'छत्तीसगड' राज्याला _____ व _____ जिल्ह्यांची सरहद्द आहे.

Options :

1. गडचिरोली व भंडारा

2. भंडारा व गोंदिया

3. गोंदिया व गडचिरोली

4. नागपूर व गोंदिया

Question Number : 7 Question Id : 5623032867 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

2011 च्या जनगणनेनुसार लोक संख्येचे लिंगगुणोत्तर _____ जिल्ह्यांत सर्वात कमी होते.

Options :

1. सिंधुदुर्ग

2. गोंदिया

3. मुंबई शहर

4. ठाणे

Question Number : 8 Question Id : 5623032868 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

'काटेपूर्णा' अभयारण्य खालीलपैकी कोणत्या जिल्ह्यात आहे ?

Options :

1. अमरावती

2. नागपूर

3. नाशिक

4. वाशिम

Question Number : 9 Question Id : 5623032869 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 नुसार जन माहिती अधिकाऱ्यानी अर्ज मिळाल्यानंतर किती दिवसांत माहिती द्यावी ?

Options :

1. 15 दिवस

2. 30 दिवस

3. 45 दिवस

4. 60 दिवस

Question Number : 10 Question Id : 5623032870 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील विधानांचे काळजीपूर्वक अवलोकन करून योग्य पर्याय निवडा.

विधान – I : केंद्रीय मुख्य माहिती आयुक्त पदाचा कालावधी चार वर्षे आहे.

विधान – II : केंद्रीय मुख्य माहिती आयुक्त हे त्यांच्या वयाच्या सत्तर वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर राहू शकतात.

Options :

1. विधान I बरोबर, विधान II चूक

2. विधान II बरोबर, विधान I चूक

3. दोन्ही विधाने बरोबर आहेत

4. दोन्ही विधाने चूक आहेत

Question Number : 11 Question Id : 5623032871 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र प्राचीन स्मारके आणि पुरातत्त्व स्थळे आणि अवशेष अधिनियम, 1960 च्या कोणत्या कलमानुसार संरक्षित क्षेत्रात उत्खनन करण्याचा अधिकार आहे ?

Options :

1. कलम 23

2. कलम 30

3. कलम 31

4. कलम 33

Question Number : 12 Question Id : 5623032872 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतीय संसदेच्या पुढीलपैकी कोणत्या संसदीय समित्यांची सदस्य संख्या संसदेच्या दोन्ही सभागृहातील सदस्यां मधून पूर्ण केली जाते ?

अ. सार्वजनिक उपक्रम समिती

ब. अंदाज समिती

क. लोकलेखा समिती

Options :

1. अ, ब, क

2. अ, क

3. अ, ब

4. ब, क

Question Number : 13 Question Id : 5623032873 Question Type : MCQ Option Shuffling : No

Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी सर्वात जास्त कोणावर अवलंबून असते ?

Options :

1. सार्वजनिक सहकार्य

2. प्रभावी प्रतिपक्ष

3. सरकारकड़े उपलब्ध संसाधन

4. न्यायालयांची भूमिका

Question Number : 14 Question Id : 5623032874 Question Type : MCQ Option Shuffling : No

Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतीय संविधानातील पुढीलपैकी कोणत्या संविधान दुरूस्तीने दिल्ली या केंद्रशासित प्रदेशाला 'राष्ट्रीय राजधानी प्रदेश' हे नाव तसेच विधिमंडळाची तरतूद करण्यात आली आहे ?

Options :

1. 69 वी संविधान दुरूस्ती

2. 70 वी संविधान दुरूस्ती

3. 12 वी संविधान दुरूस्ती

4. 19 वी संविधान दुरूस्ती

Question Number : 15 Question Id : 5623032875 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारताच्या संविधान परिषदे संदर्भातील पुढील विधानापैकी योग्य विधाने कोणती आहेत ?

अ. या परिषदेच्या सदस्यांची निवड अप्रत्यक्ष निवडणूकांच्या मार्फत झाली होती प्रांतिक विधिमंडळ सदस्यांनी ही निवड केली.

ब. या परिषदेत चिफ कमिशनर प्रांताचे प्रतिनिधी नव्हते.

क. फाळणीनंतर पाकिस्तान साठी स्वतंत्र संविधान परिषदेची निर्मिती करण्यात आली.

Options :

1. अ, ब, क

2. अ

3. अ, क

4. ब, क

Question Number : 16 Question Id : 5623032876 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

योग्य जोड्या जुळवा.

a. राष्ट्रीय आणीबाणी	i. कलम 129
b. राज्य आणीबाणी	ii. कलम 352
c. आर्थिक आणीबाणी	iii. कलम 356
d. सर्वोच्च न्यायालयाची अभिलेख न्यायालय भूमिका	iv. कलम 360

Options :

1. a – i b – ii c – iii d – iv

2. a – ii b – iii c – iv d – i

3. a – iv b – iii c – ii d – i

4. a – iii b – ii c – iv d – i

Question Number : 17 Question Id : 5623032877 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

क्लाउड मधील व्हर्च्युअल मशीन्स खालीलपैकी कोणती सेवा उपलब्ध करते ?

Options :

1. SaaS

2. PaaS

3. IaaS

4. BaaS

Question Number : 18 Question Id : 5623032878 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

नेटवर्किंग मध्ये IP चे पूर्ण रूप काय आहे ?

Options :

1. इंटरनॅशनल प्रोटोकॉल (International Protocol)

2. इंटरनॅशनल प्रोग्राम (International Program)

3. इंटरनेट प्रोटोकॉल (Internet Protocol)

4. इंटरनेट प्रोग्राम (Internet Program)

Question Number : 19 Question Id : 5623032879 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

संयुक्त राष्ट्र महासभेने वर्ष 1999 मध्ये जे घोषणापत्र स्विकारले त्यामध्ये खालील अधिकाराचा समावेश नाही

Options :

1. शांतीपूर्वक एकत्र येणे किंवा जमा होणे

2. संघटना व गैर सरकारी संस्था स्थापन करणे

3. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मानव अधिकाराच्या उल्लंघनासाठी प्रयत्न करणे

4. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकारांच्या संरक्षणार्थ व प्राप्तीसाठी प्रयत्न करणे

Question Number : 20 Question Id : 5623032880 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

विधान – अ : 30 नोहेंबर 1960 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेने बालकांच्या हक्कांची घोषणा स्विकारली.

विधान – ब : भारतीय संविधानातील कलम 14 हे मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्रमधील कलम 7 सोबत मिळते जुळते आहे.

योग्य पर्याय निवडा.

Options :

1. विधान अ बरोबर, ब चूक आहे

2. विधान ब बरोबर, अ चूक आहे

3. दोन्ही विधाने बरोबर आहेत

4. दोन्ही विधाने चूक आहेत

Question Number : 21 Question Id : 5623032881 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

विधान – I : 'मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र' मध्ये एकूण 30 कलमे समाविष्ट आहेत.

विधान – II : 'मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र' मधील कलम 6 गुलामगिरीच्या बंदीशी संबंधीत आहे.

योग्य पर्याय निवडा.

Options :

1. विधान I बरोबर, II चूक आहे

2. विधान II बरोबर, I चूक आहे

3. दोन्ही विधाने बरोबर आहेत

4. दोन्ही विधाने चूक आहेत

Question Number : 22 Question Id : 5623032882 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

मानव अधिकारांचा वैश्विक जाहीरनामा (UDHR) युनायटेड नेशन्सद्वारे कोणत्या वर्षी अंमलात आणले ?

Options :

1. 1947

2. 1948

3. 1945

4. 1984

Question Number : 23 Question Id : 5623032883 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

संयुक्त राष्ट्र संघाने महिलांविरुद्ध सर्व प्रकारचा भेदभाव निर्मूलन जाहीरनामा कोणत्या वर्षी स्विकारला ?

Options :

1. 1919

2. 1979

3. 1949

4. 2010

Question Number : 24 Question Id : 5623032884 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी _____ हा मानवाधिकार भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद 19 मध्ये उपलब्ध नाही.

Options :

1. अभिव्यक्ती स्वातंत्र्य

2. संघटना स्वातंत्र्याचा अधिकार

3. मालमत्ता/संपत्तीचा अधिकार

4. वरीलपैकी कोणतेही नाही

Question Number : 25 Question Id : 5623032885 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतातील 56 वा गुरु घासीदास तमोर पिंगळा व्याघ्र प्रकल्प कोणत्या राज्यात आहे ?

Options :

1. छत्तीसगड

2. राजस्थान

3. आसाम

4. आंध्र प्रदेश

Question Number : 26 Question Id : 5623032886 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

'ऑस्कर 2025' पुरस्कारासाठी भारतातर्फे निवड करण्यात आलेल्या 'लापता लेडिज' या चित्रपटाविषयी खालील विधान/विधाने तपासा.

अ. 8 मार्च 2024 रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला.

ब. किरण राव या चित्रपटाच्या दिग्दर्शिका आहेत.

क. हा चित्रपट किरण राव प्रॉडक्शनची निर्मिती आहे.

ड. भारतीय चित्रपट महासंघाने 'ऑस्कर 2025' साठी या चित्रपटाची निवड केली.

Options :

1. अ, क बरोबर आणि ब, ड चूक

2. अ, ब बरोबर आणि क, ड चूक

3. अ, ड बरोबर आणि ब, क चूक

4. ब, ड बरोबर आणि अ, क चूक

Question Number : 27 Question Id : 5623032887 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

नॅशनल इंस्टीट्यूशनल रैंकिंग फ्रेमवर्क-2024 अनुसार _____.

अ. आई.आई.टी. मद्रास सहाव्यांदा प्रथम स्थानावर.

ब. टॉप-100 मध्ये महाराष्ट्राची 11 उच्च शिखर संस्थाने समाविष्ट.

क. मेडीकल कॉलेज रैंकिंग मध्ये दिल्ली एम्स प्रथम स्थानावर.

ड. मॅनेजमेंटमध्ये आई.आई.एम. अहमदाबाद अव्वल स्थानावर.

वरीलपैकी कोणते कथन/कथने चुकीचे नाही/नाहीत ?

Options :

1. फक्त अ आणि ब

2. फक्त अ, ब आणि क

3. फक्त ब, क आणि ड

4. वरील सर्व

Question Number : 28 Question Id : 5623032888 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सीओपी-29 शिखर परिषदेची ठळक वैशिष्ट्ये

अ. कार्बन उत्सर्जनावर नियंत्रणासाठी या परिषदेत प्रयत्न.

ब. या परिषदेचे यजमान अझरबैजान होते.

क. या परिषदेत भारताचा क्लाइमेंट फाइनेंस आणि हरित क्रेडिट वर जोर.

ड. पॅरिस करार 2015 तील कलम 6 अंतर्गत कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी सहकार्य पुरविण्याची तरतूद.

वरीलपैकी कोणता/कोणते वाक्य/वाक्ये बरोबर नाही/नाहीत ?

Options :

1. फक्त ब

2. फक्त ड

3. वरील सर्व

4. वरीलपैकी नाही

Question Number : 29 Question Id : 5623032889 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतीय अंतराळ संशोधन संघटना आणि भौतिक संशोधन प्रयोगशाळा या दोन्हीच्या निर्मितीत महत्वाची भूमिका खालीलपैकी कोणी बजावली ?

Options :

1. विक्रम साराभाई

2. डॉ. होमी भाभा

3. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

4. वरीलपैकी सर्व

Question Number : 30 Question Id : 5623032890 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतातील पहिला कृत्रिम उपग्रह कोणता ?

Options :

1. भास्कर

2. रोहिणी

3. आर्यभट्ट

4. इन्सॅट – १अ (INSAT-1A)

Question Number : 31 Question Id : 5623032891 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

ऑक्सिओम मिशन-4 मधील क्रु मेंबर्स कोणत्या देशातील आहेत ?

a. यु.एस.ए.

b. भारत

c. जपान

d. हंगेरी

e. पोलंड

f. रशिया

Options :

1. a, b, c, e

2. a, b, d, e

3. a, b, d, f

4. a, b, e, f

Question Number : 32 Question Id : 5623032892 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतीय अवकाश संशोधन संस्था (ISRO) ची स्थापना केव्हा झाली ?

Options :

1. 1962

2. 1963

3. 1969

4. 1970

Question Number : 33 Question Id : 5623032893 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

एक पाण्याची टाकी पहिल्या नळाने 6 तासात भरते तर दुसऱ्या नळाने ती भरल्यास 12 तास लागतात. जर दोन्ही नळ एकाच वेळी चालू केले तर ती रिकामी टाकी भरण्यास किती वेळ लागेल ?

Options :

1. 3 तास

2. 3 तास 30 मिनिटे

3. 4 तास

4. 4 तास 30 मिनिटे

Question Number : 34 Question Id : 5623032894 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा

ACE : BDF : : GIK : ?

Options :

1. HJL

2. HJM

3. IKL

4. HKL

Question Number : 35 Question Id : 5623032895 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

A, B, C, D, E आणि F असे सहा मित्र एका रांगेत उत्तरेकडे तोंड करून बसले आहेत. 'C' हा 'A' आणि 'E' च्या मध्ये बसला आहे. 'D' हा कोणत्याही कडेला नाही. 'B' हा 'E' च्या लगत उजवीकडे बसला आहे. F हा उजवीकडे शेवटी नाही, तर 'D' च्या उजवीकडे एकूण किती जण बसले आहेत ?

Options :

1. एक

2. दोन

3. तीन

4. चार

Question Number : 36 Question Id : 5623032896 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी योग्य संख्या निवडा.

'अकरा हजार अकराशे अकरा' म्हणजे किती ?

Options :

1. 111111

2. 12111

3. 11000110011

4. XIX

Question Number : 37 Question Id : 5623032897 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

आरती ही सान्या पेक्षा मोठी आहे. मुस्कान ही आरतीपेक्षा मोठी परंतु कशीश पेक्षा लहान आहे. कशीश ही सान्या पेक्षा मोठी आहे. सान्या ही मुस्कान पेक्षा लहान आहे. गार्गी ही सर्वात मोठी आहे. तर ह्यांच्यामध्ये सर्वात लहान कोण आहे ?

Options :

1. सान्या

2. मुस्कान

3. आरती

4. कशीश

Question Number : 38 Question Id : 5623032898 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी न जुळणारी संख्या ओळखा :

420, 535, 735, 840

Options :

1. 840

2. 420

3. 535

4. 735

Question Number : 39 Question Id : 5623032899 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खाली एक विधान व त्याचे चार निष्कर्ष दिले आहेत. दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणते निष्कर्ष विधानाशी सुसंगत आहे, ते ओळखा ?

विधान : सर्व फांद्या फुले आहेत. सर्व फुले पाने आहेत.

निष्कर्ष : I. सर्व फांद्या पाने आहेत.

II. सर्व पाने फांद्या आहेत.

III. सर्व फुले फांद्या आहेत

IV. काही पाने फांद्या आहेत

Options :

1. एकही नाही

2. केवळ I आणि IV सुसंगत

3. केवळ II आणि III सुसंगत

4. सर्व सुसंगत आहेत

Question Number : 40 Question Id : 5623032900 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

जर NAME (नेम) = 16.5

तर TAME (टेम) = ?

Options :

1. 18.5

2. 19.5

3. 20.5

4. 29.5

Question Number : 41 Question Id : 5623032901 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण 2010 मसुदा समितीचे उपाध्यक्ष कोण होते ?

Options :

1. शफाअत खान

2. आ. ह. साळुंखे

3. दत्ता भगत

4. डॉ. अरुण टिकेकर

Question Number : 42 Question Id : 5623032902 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सांस्कृतिक धोरण 2010 मध्ये खालीलपैकी कोणत्या घटकांचा समावेश नाही ?

अ. मराठी बोली अकादमी

ब. शिवकिल्ले मालिका योजना

क. संतपीठ

ड. रेडीओसाठी विशेष पुरस्कार

Options :

1. अ, ब, क बरोबर ड चूक

2. अ, ब, ड बरोबर क चूक

3. ब, ड, क बरोबर अ चूक

4. अ, क, ड बरोबर ब चूक

Question Number : 43 Question Id : 5623032903 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्रातील कोणत्या प्रयोगात्मक कलांचा अभिजात स्वरूपाचे जतन करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, 2010 मधून प्रयत्न करण्यात आले आहेत ?

Options :

1. कथ्थक

2. भरतनाट्यम

3. लावणी

4. कुचीपुडी

Question Number : 44 Question Id : 5623032904 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

राज्य सांस्कृतिक धोरण, 2024 मध्ये खालीलपैकी कोणते क्षेत्र अंतर्भूत नाही ?

अ. भक्ति संस्कृती

ब. लोककला

क. रेडीओ व टेलेव्हीजन

ड. चित्रपट

Options :

1. सर्व बरोबर

2. अ, ब, क बरोबर ड चूक

3. अ, ब, ड बरोबर क चूक

4. ब, क, ड बरोबर अ चूक

Question Number : 45 Question Id : 5623032905 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र राज्याचे पहिले सांस्कृतिक धोरण केव्हा जाहीर झाले ?

Options :

1. सन 2011

2. सन 2009

3. सन 2010

4. सन 2008

Question Number : 46 Question Id : 5623032906 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, 2010 नुसार क्रीडा संस्कृतीच्या संवर्धनासाठी कोणते उपक्रम सुचविण्यात आले आहेत ?

a. प्रादेशिक समतोल

b. भारतीय खेळ-शास्त्रीय चिकित्सेची जोड

c. विदेशी खेळांचा प्रसार

d. विविध समाजघटक-क्रीडा नैपुण्य विकास

Options :

1. a, b, c आणि d बरोबर

2. वरीलपैकी कोणताही पर्याय बरोबर नाही

3. फक्त b बरोबर

4. फक्त a, b आणि d बरोबर

Question Number : 47 Question Id : 5623032907 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महिलांविषयक सांस्कृतिक दृष्टिकोन राखण्यासाठी महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, 2010 मध्ये कोणत्या बाबींचा समावेश करण्यात आला आहे ?

a. स्त्री-पुरुष प्रमाण संतुलन

b. देवदासी सर्वेक्षण

c. महिला संत अध्यासन

d. महिला विकास योजना

Options :

1. फक्त d बरोबर

2. फक्त c बरोबर

3. वरीलपैकी कोणताच पर्याय बरोबर नाही

4. a, b, c आणि d बरोबर

Question Number : 48 Question Id : 5623032908 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्राचे सांस्कृतिक धोरण, 2010 मध्ये सांस्कृतिक धोरणाचा आढावा किती वर्षांनी घेण्यात यावा, अशी तरतूद होती ?

Options :

1. चार

2. तीन

3. पाच

4. सहा

Question Number : 49 Question Id : 5623032909 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

योग्य विधान/ने ओळखा.

a. सांस्कृतिक घटक हे फक्त मनोरंजन व प्रबोधन यापुरतेच मर्यादित आहेत.

b. सन 2023 च्या G-20 दृष्टीकोनानुसार सांस्कृतिक क्षेत्राला सर्वांगीण विकासासाठी प्रेरक घटक म्हणून संबोधले आहे.

c. महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीची जागतिक स्तरावर ओळख निर्माण करण्यासाठी सांस्कृतिक धोरण, 2024 चा उपयोग होईल.

Options :

1. फक्त a बरोबर

2. b, c बरोबर

3. a, c बरोबर

4. a, b बरोबर

Question Number : 50 Question Id : 5623032910 Question Type : MCQ Option Shuffling : No Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण, 2024 मधील अहवालात निश्चित केलेली क्षेत्रे कोणती ?

a. दृष्यकला

b. रंगभूमी

c. नृत्य

d. वरील सर्व

Options :

1. a फक्त बरोबर बाकी सर्व चूक

2. b फक्त बरोबर बाकी सर्व चूक

3. c फक्त बरोबर बाकी सर्व चूक

4. d बरोबर

Question Number : 51 Question Id : 5623032911 Question Type : MCQ Option Shuffling : No Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सांस्कृतिक धोरण, 2024 मध्ये, मराठी भाषेत नवीन शब्दांची निर्मिती करणाऱ्या आणि इंग्रजी व इतर भाषांमधील सर्रास वापरल्या जाणाऱ्या शब्दांना पर्यायी शब्द निर्माण करणाऱ्या शब्दप्रभूंना खालीलपैकी कोणत्या पुरस्काराने सन्मानित करण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे ?

Options :

1. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी शब्दसेवक पुरस्कार

2. स्वातंत्र्यवीर सावरकर शब्दसेवक पुरस्कार

3. कुसुमाग्रज शब्दसेवक पुरस्कार

4. विंदा करंदीकर शब्दसेवक पुरस्कार

Question Number : 52 Question Id : 5623032912 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

राज्य सांस्कृतिक धोरण, 2024 मध्ये चित्रपट क्षेत्रासाठी गैरलागू विधान/विधाने कोणती ?

अ. टुरिंग टॉकीज व्यवसायासाठी आर्थिक अनुदानाची तरतूद करणे

ब. मराठी चित्रपट चित्रपटगृहांमध्ये विनाशुल्क दाखविणे

क. राज्याच्या सर्व महसुली विभागात चित्रनगरी निर्माण करणे

ड. दर्जेदार मराठी चित्रपटांना सहकार्य करणे

Options :

1. अ ते ड सर्व बरोबर

2. अ, ब, क बरोबर ड चूक

3. अ व ड बरोबर ब व क चूक

4. अ, क, ड बरोबर ब चूक

Question Number : 53 Question Id : 5623032913 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्राप्त पुरस्कार विजेत्यांचा वर्षनिहाय योग्य क्रम लावा.

अ. डॉ. अभय बंग व डॉ. राणी बंग

ब. श्री. बाबा आमटे

क. श्री. रा. कृ. पाटील

ड. श्री. नानासाहेब धर्माधिकारी

Options :

1. अ, ब, क, ड

2. अ, ब, ड, क

3. ब, अ, क, ड

4. ब, अ, ड, क

Question Number : 54 Question Id : 5623032914 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

योग्य जोड्या लावा :

संरक्षित स्मारक	तालुका
a. उक्षी कातळशिल्प	i. माहुर
b. गढी–अहिल्याबाई होळकर जन्मस्थान	ii. कोल्हापूर
c. लक्ष्मीविलास पॅलेस	iii. जामखेड
d. पांडव लेणी	iv. रत्नागिरी

Options :

1. a – iv b – iii c – ii d – i

2. a – i b – ii c – iii d – iv

3. a – i b – iii c – ii d – iv

4. a – iv b – ii c – iii d – i

Question Number : 55 Question Id : 5623032915 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

विठाबाई नारायणगावकर लोककला जीवन गौरव पुरस्कार कोणत्या लोककला क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तिस दिला जातो ?

Options :

1. दशावतार

2. नमन

3. वहिगायन

4. तमाशा

Question Number : 56 Question Id : 5623032916 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

शिवनेरी किल्ला, ता. जुन्नर, जिल्हा पुणे येथे _____ या कालावधी दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्म महोत्सवानिमित्त हिंदवी स्वराज्य (महादुर्ग) महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

Options :

1. 20 ते 22 फेब्रुवारी 2025

2. 19 ते 21 फेब्रुवारी 2025

3. 24 ते 26 फेब्रुवारी 2025

4. 23 ते 25 फेब्रुवारी 2025

Question Number : 57 Question Id : 5623032917 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

कोणत्या आंतरराष्ट्रीय संमेलनात/परिषदेत सांस्कृतिक घटक ही सार्वजनिक संपदा असल्याबाबत विस्तृत चर्चा झाली ?

Options :

1. वेव्हज (WAVES)

2. कॉमनवेल्थ (COMMONWEALTH)

3. जी-२० (G-20)

4. सार्क (SAARC)

Question Number : 58 Question Id : 5623032918 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील वाक्ये वाचावीत.

अ. ''विठाबाई नारायणगावकर लोककला जीवन गौरव पुरस्कार'' हा पुरस्कार 2005-06 पासून सुरू करण्यात आला.

ब. त्या वर्षी श्रीमती कांताबाई सातारकर ह्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

यापैकी

Options :

1. अ व ब दोन्ही बरोबर आहेत

2. केवळ अ बरोबर आहे

3. केवळ ब बरोबर आहे

4. अ व ब दोन्ही चूक आहेत

Question Number : 59 Question Id : 5623032919 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सन 2006-07 या वर्षीचा नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार खालीलपैकी कुणाला प्रदान करण्यात आला ?

Options :

1. श्री. प्रभाकर पणशीकर

2. श्रीम. सुलभा देशपांडे

3. श्रीम. विजया मेहता

4. श्री. भालचंद्र पेंढारकर

Question Number : 60 Question Id : 5623032920 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी कोणते गीत ''महाराष्ट्र गीत'' म्हणून स्विकारण्यात आलेले आहे ?

Options :

1. जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा

2. बहु असोत संपन्न सुंदर की महा, प्रिय अमुचा महाराष्ट्र देश हा

3. मंगल देशा, पवित्र देशा, महाराष्ट्र देशा

4. आमचा महाराष्ट्र महान

Question Number : 61 Question Id : 5623032921 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र शासनाद्वारे देण्यात येणाऱ्या लता मंगेशकर पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा अचूक पर्याय ओळखा.

अ. उत्तम सिंग

ब. पंकज उधास

क. सुरेश वाडकर

ड. प्रभाकर जोग

Options :

1. फक्त अ, ब आणि क

2. फक्त अ, क आणि ड

3. फक्त ब, क आणि ड

4. वरील सर्व

Question Number : 62 Question Id : 5623032922 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी कोणते शस्त्र महाराष्ट्राचे राज्य शस्त्र म्हणून घोषित करण्यात आलेले आहे ?

Options :

1. तलवार

2. दांड-पट्टा

3. भाला

4. वाघनखे

Question Number : 63 Question Id : 5623032923 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील वाक्यांचा विचार करावा.

अ. महाराष्ट्र पर्यटन धोरण 2024 अंतर्गत महाराष्ट्रात MICE (Meetings, Incentives, Conferences and Exhibitions) ची दि. 15-5-25 रोजी सुरुवात करण्यात आली.

ब. पर्यटन धोरण 2024 अंतर्गत राज्यात किमान रु. 1,00,000 कोटीची गुंतवणुक व किमान 18 लाख रोजगार येत्या 10 वर्षात निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

यापैकी

Options :

1. अ व ब दोन्ही बरोबर आहेत

2. केवल अ बरोबर आहे

3. केवल ब बरोबर आहे

4. अ व ब दोन्ही चूक आहेत

Question Number : 64 Question Id : 5623032924 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सन 2025 मध्ये _____ या प्रसिद्ध अभिनेत्याचा जन्म शताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला होता.

Options :

1. स्वर्गीय देव आनंद

2. स्वर्गीय दिलीप कुमार

3. स्वर्गीय सुनिल दत्त

4. स्वर्गीय राज कपूर

Question Number : 65 Question Id : 5623032925 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील वाक्ये वाचावीत.

अ. पर्यटन व सांस्कृतिक विभागातर्फे कंटेन्ट क्रिएटर, इन्फ्लुएन्सर्स (influencers) साठी अनुदान देण्याबाबत योजना सुरू करण्यात आलेली आहे.

ब. सामाजिक माध्यमांवर 10 लक्ष पेक्षा जास्त फॉलोअर्स असणाऱ्यांना प्रतिमहा रु. 1.00 लक्ष याप्रमाणे वर्षभर प्रायोजकत्व देण्यात येते.

या वाक्यांपैकी

Options :

1. अ व ब दोन्ही बरोबर

2. केवळ अ बरोबर

3. केवळ ब बरोबर

4. अ व ब दोन्ही चूक

Question Number : 66 Question Id : 5623032926 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारत सरकारच्या विशेष सहाय योजनेंतर्गत आयकॉनिक टुरिस्ट सेंटर म्हणून खालीलपैकी कोणते प्रकल्प मंजूर करण्यात आलेले आहेत ?

अ. अजिंठा-वेरुळ लेणी, छत्रपती संभाजीनगर

ब. रामलाल पथ विकास, नाशिक

क. महाबळेश्वर, जि. सातारा

ड. जागतिक दर्जाचे जलमग्न पर्यटन गंतव्य स्थळ, सिंधुदुर्ग

Options :

1. फक्त अ आणि ड

2. फक्त ब आणि ड

3. फक्त अ आणि क

4. फक्त क आणि ड

Question Number : 67 Question Id : 5623032927 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

''संगीत नाटक अकादमी'' प्रदर्शन कलेच्या क्षेत्रात देशात शिर्षस्थ संस्था आहे. या संस्थेची स्थापना इ.स. _____ मध्ये झाली होती.

Options :

1. सन 1955

2. सन 1953

3. सन 1950

4. सन 1960

Question Number : 68 Question Id : 5623032928 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

पर्यटन व सांस्कृतिक विभागाची स्थापना कोणत्या दोन विभागातील उपविभागामधून करण्यात आली आहे ?

Options :

1. गृह विभाग व सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग

2. वित्त विभाग व सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग

3. गृह विभाग व अल्पसंख्यांक विभाग

4. वित्त विभाग व अल्पसंख्यांक विभाग

Question Number : 69 Question Id : 5623032929 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

रामलिंगप्पा लामतुरे संग्रहालय कोठे आहे ?

Options :

1. पैठण

2. जामखेड

3. तेर

4. माहूर

Question Number : 70 Question Id : 5623032930 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र पर्यटन आणि सांस्कृतिक विभाग यांचे कार्य खालीलपैकी कोणते आहे ?

a. पारंपारिक लोककला जतन

b. गड व किल्ले जतन व संवर्धन

c. पर्यटन व्यवसाय वाढविणे

d. पुराभिलेख्यांचे जतन व संवर्धन

Options :

1. a बरोबर, इतर सर्व चूक

2. b बरोबर, इतर सर्व चूक

3. c चूक, इतर सर्व बरोबर

4. वरीलपैकी सर्व बरोबर

Question Number : 71 Question Id : 5623032931 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे मुख्य कार्य काय आहे ?

a. स्मारकांची निर्मिती करणे

b. सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी निधी प्रदान करणे

c. भारताबाहेरील सांस्कृतिक संबंध जपणे, नियोजन नीती व सांस्कृतिक आदान-प्रदान करणे

d. भारताचे डोळे म्हणून भारतीय संस्कृती प्रदर्शवावी

Options :

1. a व b बरोबर

2. b व c बरोबर

3. c व d बरोबर

4. b, c व d बरोबर

Question Number : 72 Question Id : 5623032932 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजना _____ पासून संपूर्ण राज्यात सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत राबविली जाते.

Options :

1. सन 1960-61

2. सन 1954-55

3. सन 1950-51

4. सन 1965-66

Question Number : 73 Question Id : 5623032933 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील वाक्यांचा विचार करावा.

अ. केंद्रीय संस्कृति मंत्रालय, भारत सरकारच्या अधीनस्थ असलेले दक्षिण-मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, नागपूर येथे स्थापन करण्यात आले आहे.

ब. या अंतर्गत महाराष्ट्र, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, कर्नाटक व छत्तीसगड या राज्यांचा समावेश आहे.

याबाबत अचूक पर्याय कोणता ?

Options :

1. अ व ब दोन्ही बरोबर

2. अ व ब दोन्ही चूक

3. केवळ अ बरोबर

4. केवळ ब बरोबर

Question Number : 74 Question Id : 5623032934 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सन _____ पासून राज्यातील उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांना राज्य शासनाकडून पुरस्कार प्रदान करण्यात येतो.

Options :

1. सन 2020

2. सन 2021

3. सन 2023

4. सन 2022

Question Number : 75 Question Id : 5623032935 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

''भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाचा इतिहास आधार साहित्याचे प्रकाशन'' ही योजना खालीलपैकी कोणत्या कार्यालयाद्वारे राबविण्यात येते ?

Options :

1. दर्शनिका विभाग

2. रंगभूमी प्रयोग परिनिरिक्षण मंडळ

3. पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय

4. पुराभिलेख संचालनालय

Question Number : 76 Question Id : 5623032936 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

उद्योन्मुख व होतकरू कलाकारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी मार्फत दर शुक्रवारी खालीलपैकी कोणता उपक्रम राबविण्यात येतो ?

Options :

1. पु. ल. कला महोत्सव

2. कलांगण महोत्सव

3. पु. ल. कट्टा

4. महिला कला महोत्सव

Question Number : 77 Question Id : 5623032937 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्र राज्यातील मान्यवर वृद्ध साहित्यिक व कलावंत यांना मानधन योजनेंतर्गत खालील अटींच्या अधिन राहून मानधन देण्यात येते :

i. ज्या व्यक्तींनी साहित्य क्षेत्रात मोलाची भर घातली आहे.

ii. ज्याचे वय 55 वर्ष पूर्ण किंवा त्यापेक्षा जास्त आहे.

iii. ज्या कलावंत/साहित्यिक यांचे उत्पन्न रु. 48,000/- पेक्षा जास्त नाही.

iv. शासनाच्या अन्य कोणत्याही योजनेचा लाभ मिळत नसलेले.

Options :

1. i, ii बरोबर

2. i, iv बरोबर

3. i, iii, iv बरोबर

4. i, ii, iii, iv बरोबर

Question Number : 78 Question Id : 5623032938 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील प्रकारच्या चित्रपट महोत्सवांसाठी विविध संस्थांना महाराष्ट्र शासन अर्थसहाय्य प्रदान करते.

i. पुणे फिल्म फाऊंडेशन आयोजित – पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव.

ii. मुंबई ॲकेडमी ऑफ मुवींग इमेजेस् – मामि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव.

iii. आशियाई फिल्म फाऊंडेशन – थर्ड ऑय एशियन चित्रपट महोत्सव.

iv. आयफा फिल्मफेयर फाऊंडेशन – आयफा चित्रपट महोत्सव.

Options :

1. i व ii बरोबर

2. i, ii, iii बरोबर

3. ii व iv बरोबर

4. iii व iv बरोबर

Question Number : 79 Question Id : 5623032939 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

प्राणी, पक्षी व किटक या जीवजातींचे नमुने संरक्षित करण्यासाठी कोणत्या संस्थेला महाराष्ट्र शासनामार्फत अनुदान देण्यात येते ?

Options :

1. पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय

2. मुंबई निसर्गोतिहास संस्था

3. जहांगिर आर्ट गॅलरी

4. राज्य पुराभिलेख मंडळ

Question Number : 80 Question Id : 5623032940 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

पं. भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजनेच्या बाबतीत अचूक विधाने ओळखा.

अ. शास्त्रीय संगीतात फक्त गायनासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

ब. शास्त्रीय संगीतात गायन आणि वादन या दोन्हींसाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

क. भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांच्या स्मरणार्थ ही योजना सुरू करण्यात आलेली आहे.

Options :

1. फक्त अ चूक

2. फक्त ब चूक

3. फक्त क चूक

4. सर्व विधाने बरोबर आहेत

Question Number : 81 Question Id : 5623032941 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

नाट्य निर्मिती अनुदान योजनेअंतर्गत अनुदानास पात्र ठरण्यासाठी नाटकास 100 पैकी किमान किती गुण प्राप्त करणे आवश्यक आहे ?

Options :

1. 51 गुण

2. 61 गुण

3. 71 गुण

4. 81 गुण

Question Number : 82 Question Id : 5623032942 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

राज्य नाट्य स्पर्धेच्या बाबतीतील खालीलपैकी अचूक विधाने ओळखा.

अ. सन 1954 पासून ही स्पर्धा/योजना राबविण्यात येते.

ब. या अंतर्गत हौशी मराठी, संस्कृत, हिंदी नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात येते.

क. या अंतर्गत महिलांसाठी स्वतंत्र स्पर्धा आयोजित करण्यात येते.

ड. या अंतर्गत स्वतंत्र बालनाट्य स्पर्धा आयोजित करण्यात येते.

Options :

1. अ, क, ड बरोबर

2. अ, ब, ड बरोबर

3. अ, ब, क बरोबर

4. सर्व विधाने बरोबर आहेत

Question Number : 83 Question Id : 5623032943 Question Type : MCQ Option Shuffling : No Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

कार्यक्रमाच्या संदर्भात “RSVP” चा अर्थ काय ?

Options :

1. कार्यक्रमाची नियंत्रण पत्रिका

2. कार्यक्रमाला येण्यासाठी प्रतिसाद द्या

3. कार्यक्रमानंतरचा फिडबॅक फॉर्म

4. तपासणी सूची

Question Number : 84 Question Id : 5623032944 Question Type : MCQ Option Shuffling : No Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

“Debrief” चा अर्थ काय आहे ?

Options :

1. कार्यक्रमाची जाहीरात

2. कार्यक्रमाचे बजेट

3. कार्यक्रमानंतरचे विश्लेषण सत्र

4. आवाजाची चाचणी

Question Number : 85 Question Id : 5623032945 Question Type : MCQ Option Shuffling : No Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

इव्हेंट मॅनेजमेंट मध्ये कायदेशीर परवाने आणि परवानग्या यांचे काय महत्व आहे ?

Options :

1. महसूल मिळविण्यासाठी

2. कार्यक्रम अधिक प्रभावी आणि सुरक्षित बनविण्यासाठी

3. औपचारीकता म्हणून

4. जाहीरातीसाठी

Question Number : 86 Question Id : 5623032946 Question Type : MCQ Option Shuffling : No Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

इव्हेंट मॅनेजरसाठी चांगली वाटाघाटी (Negotiation) कौशल्ये फायदेशीर का आहेत ?

Options :

1. इव्हेंटचा कालावधी वाढविण्यासाठी

2. पुरवठादारांशी चांगले सौदे करून खर्च वाचवण्यासाठी

3. पुरवठादारांशी संवाद वाढविण्यासाठी

4. रचनात्मक बाबींवर लक्ष केंद्रित करण्यासाठी

Question Number : 87 Question Id : 5623032947 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी कोणती संस्था भारतात सक्रिय पातळीवर सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करते ?

a. राष्ट्रीय विज्ञान संस्था

b. केंद्रीय माध्यमिक शिक्षण संस्था

c. संगीत नाटक अकादमी

d. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

Options :

1. a व b बरोबर इतर चूक

2. b व c चूक इतर सर्व बरोबर

3. c बरोबर इतर सर्व चूक

4. a व d बरोबर इतर सर्व चूक

Question Number : 88 Question Id : 5623032948 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने खालीलपैकी कोणत्या नाट्य स्पर्धांचे आयोजन करण्यात येते ?

a. मराठी हौशी नाट्य स्पर्धा

b. हिंदी नाट्य स्पर्धा

c. संगीत नाट्य स्पर्धा

d. संस्कृत नाट्य स्पर्धा

e. कोंकणी भाषा नाट्य स्पर्धा

f. कन्नड भाषा नाट्य स्पर्धा

Options :

1. फक्त a, f बरोबर बाकी सर्व चूक

2. फक्त a, b, e बरोबर बाकी सर्व चूक

3. फक्त a, b, c, e बरोबर बाकी सर्व चूक

4. a, b, c, d बरोबर

Question Number : 89 Question Id : 5623032949 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

योग्य जोड्या जुळवा.

	नाटके		नाटककार
अ.	कुसुम मनोहर लेले	i.	वसंत कानेटकर
ब.	घाशीराम कोतवाल	ii.	विजय तेंडुलकर
क.	हमिदाबाईची कोठी	iii.	अशोक समेळ
ड.	रायगडाला जेंव्हा जाग येते	iv.	अनिल बर्वे

Options :

1. अ – iv ब – ii क – iii ड – i

2. अ – iii ब – ii क – i ड – iv

3. अ – iii ब – ii क – iv ड – i

4. अ – iv ब – ii क – i ड – iii

Question Number : 90 Question Id : 5623032950 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

''भेर फुंकणे'' ही लोप पावत चाललेली लोककला कोणत्या प्रादेशिक विभागातील आहे ?

Options :

1. कोकण

2. मराठवाडा

3. विदर्भ

4. खानदेश

Question Number : 91 Question Id : 5623032951 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या नोंदणीकृत संस्थांना सहायक अनुदान कधीपासून सुरू करण्यात आले ?

Options :

1. 1978

2. 1985

3. 1980

4. 1988

Question Number : 92 Question Id : 5623032952 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

महाराष्ट्राच्या राज्य गीताचे गीतकार कोण आहेत ?

Options :

1. कृष्णराव उर्फ शाहीर साबळे

2. राजा बढे

3. अण्णाभाऊ साठे

4. जगदीश खेबुडकर

Question Number : 93 Question Id : 5623032953 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी कोणते चर्मवाद्य नाही ?

Options :

1. पखवाज

2. मृदंग

3. सारंगी

4. संबळ

Question Number : 94 Question Id : 5623032954 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलावंत मानधन सन्मान योजना कधीपासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे ?

Options :

1. 1950-51

2. 1952-53

3. 1954-55

4. 1956-57

Question Number : 95 Question Id : 5623032955 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

संस्कृती विषयक केंद्र शासनाच्या खालील कार्यरत संस्था आणि त्यांचे स्थापना वर्ष यांच्या योग्य जोड्या लावा.

	संस्था		स्थापना वर्ष
अ.	संगीत नाटक अकादमी	i.	1950
ब.	राष्ट्रीय नाट्य अकादमी (NSD)	ii.	1954
क.	साहित्य अकादमी	iii.	1959
ड.	भारतीय सांस्कृतिक संबंध परिषद	iv.	1961

Options :

1. अ – i ब – ii क – iii ड – iv

2. अ – ii ब – iii क – iv ड – i

3. अ – iii ब – iv क – i ड – ii

4. अ – iv ब – iii क – ii ड – i

Question Number : 96 Question Id : 5623032956 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

जोड्या जुळवा.

	वारसा किल्ले		जिल्हा
अ.	खांदेरी	a.	सातारा
ब.	विजयदुर्ग	b.	नाशिक
क.	साल्हेर	c.	रायगड
ड.	प्रतापगड	d.	सिंधुदुर्ग

Options :

1. अ – b ब – a क – c ड – d

2. अ – c ब – b क – d ड – a

3. अ – c ब – d क – b ड – a

4. अ – b ब – c क – d ड – a

Question Number : 97 Question Id : 5623032957 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालील लोककला प्रकार आणि प्रादेशिक विभाग यापैकी चुकीची जोडी ओळखा.

Options :

1. झाडीपट्टी – विदर्भ

2. वहीगायन – खानदेश

3. खडीगंमत – मराठवाडा

4. दशावतार – कोकण

Question Number : 98 Question Id : 5623032958 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

खालीलपैकी कुणी राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे अध्यक्षपद भूषविले नाही ?

Options :

1. परेश रावल

2. नसिरुद्दीन शहा

3. अनुपम खेर

4. विजया मेहता

Question Number : 99 Question Id : 5623032959 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

प्रसिद्ध मराठी गीते/लोकगीते आणि त्याचे गीतकार यांच्या योग्य जोड्या लावा.

	मराठी गीत/लोकगीत		गीतकार
अ.	आम्ही ठाकरं ठाकरं	i.	विठ्ठल वाघ
ब.	आता तरी देवा मला पावशील का	ii.	हरेंद्र जाधव
क.	काळ्या मातीत मातीत तिफन चालते	iii.	जगदीश खेबुडकर
ड.	अरे मन मोहना	iv.	ना.धों. महानोर

Options :

1. अ – i ब – ii क – iii ड – iv

2. अ – iv ब – ii क – i ड – iii

3. अ – iii ब – iv क – i ड – ii

4. अ – iv ब – iii क – ii ड – i

Question Number : 100 Question Id : 5623032960 Question Type : MCQ Option Shuffling : No
Correct Marks : 2 Wrong Marks : 0.5

2025 सालचा छत्रपती संभाजी महाराज राज्य प्रेरणा गीत पुरस्कार खालीलपैकी कोणत्या गीतास देण्यात आलेला आहे ?

Options :

1. ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला

2. हे हिंदुशक्ती-संभूत-दिप्ततम तेजा

3. अनादी मी अनंत मी अवध्य मी भला

4. ज्योस्तुते श्रीमहन्मंगले । शिवास्पदे शुभदे स्वतंत्रते भगवती । त्वामंह यथोयुतां वंदे ।